22 DEC 2022
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुटबॉलमध्ये शिवाजी विद्यापीठाची हॅट्ट्रिक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जबलपूर (मध्य प्रदेश) येथे पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा सुरू आहे. त्यात मंगळवारी झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाने अजमेर येथील महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ संघाचा ५ गोलने पराभव करून विजयाची हॅटट्रिक केली.



जबलपूर येथील पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने विजयाची हॅटट्रिक नोंदविली.

सुरुवातीपासून विद्यापीठ संघाने खेळावर ताबा ठेवला. १२व्या मिनिटाला सिद्धेश साळोखे याने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका संघाला १ गोलची आघाडी मिळवून गेला. त्यानंतर आक्रमणाची धार कायम ठेवत २१ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर केवल कांबळे याने दुसरा गोल केला. त्यानंतर लगेचच ३८व्या मिनिटाला सिद्धेश साळोखेने वैयक्तिक दुसरा गोल करून तिसऱ्या गोलची आघाडी मिळवून दिली.

मध्यंतरापर्यंत हीच आघाडी कायम राहिली. त्यानंतर ५८व्या मिनिटाला रोहित पोवार याच्या पासवर केवलने वैयक्तिक दुसरा व संघाचा चौथा गोल केला. सामन्याच्या ६८ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर बदली खेळाडू निरंजन कामते याने पाचवा गोल करून विद्यापीठ संघाला विजय मिळवून दिला. संघाचा कर्णधार प्रतीक बदामे, रोहित देसाई, स्वयंम साळोखे प्रथमेश बाटे यांनी चांगला खेळ केला.

22 DEC 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाळा, महाविद्यालय परिसरांत लवकरच 'सीसीटीव्ही'

## अश्लील चित्रफितींचा मुलांवरील प्रभाव चिंताजनक : फडणवीस

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** शाळा, महाविद्यालयातील किशोरवयीन मुलांमध्ये अश्लील चित्रफीत वा तत्सम चित्रीकरणांच्या प्रभावामुळे विकृत दृष्टिकोन निर्माण होणे व त्यातून लैंगिक अत्याचार अथवा हिंसेच्या घटना घडू नयेत यासाठी परिसरात 'सीसीटीव्ही' लावण्यासह इतरही प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

मुंबईतील माटुंगा येथील महापालिकेच्या शाळेतील तेरा वर्षीय विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत उमा खापरे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहाचे लक्ष वेधले. करोनाकाळात मुलांच्या हाती दिवसभर मोबाइल राहात होते. या काळात अनेक मुले अश्लील चित्रफिती त्यावर पाहात होते. त्याचा परिणाम मुलांच्या मनावर होऊन काही ठिकाणी खुनासारख्या गंभीर घटना घडल्या. यावर सरकारने उपाययोजना करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'माटुंगा येथील घटना चिंताजनक आहे. या घटनेचा तपास सुरू आहे. अशा विकृतींना आळा घालणे अत्यंत गरजेचे आहे. सायबर गुन्ह्यांबाबत संबंधित प्राप्त तक्रारीची तांत्रिक तपासणी करण्यासाठी राज्यामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलांमध्ये अश्लील चित्रीकरणाच्या प्रभावामुळे विकृती वाढतेय. ही चिंताजनक बाब आहे. लैंगिक अत्याचारासंबंधी व्हिडीओ व अन्य मजकूर याबाबतची माहिती मिळाल्यावर समाजमाध्यम व संकेतस्थळावरून हटवण्यासंबंधी त्वरित कारवाई करण्यात येत आहे. तसेच राज्यामध्ये इंटरनेटवरील अशा प्रकारच्या मजकुरावर आणि संकेतस्थळांवरील प्रतिबंध घालण्याचे काम सुरू आहे. राज्यातील सायबर गुन्ह्यांबाबत सायबर इंटेलिजन्स युनिट प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहे. या माध्यमातून सायबर गुन्हेगारीवर वचक ठेवता येईल'.

राज्यातील काही मोठ्या शाळा, महाविद्यालयांमध्ये 'सीसीटीव्ही' बसवण्यात आले आहेत. मात्र, काही साधारण शाळा, महाविद्यालयांमध्ये 'सीसीटीव्ही' बसवण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी टप्प्याटप्प्याने 'सीसीटीव्ही' बसवण्यासंदर्भात सूचना देण्यात येतील.



**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन...** शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासंदर्भात चांगला, वाईट स्पर्श याबाबत मार्गदर्शनपर प्रशिक्षण देण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. शाळा, महाविद्यालय परिसरातील 'कॅफेटेरिया' व अन्य सुविधा यांचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण आणि गृह विभागाच्या सचिवांची समिती नेमून एक स्वतंत्र धोरण ठरविण्यात येईल", असे फडणवीस म्हणाले.

22 DEC 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्य प्रशिक्षणातून स्वयंरोजगाराचे बळ!

## विद्यापीठाच्या २ लाख १३ हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण; ६० जणांकडून लघुउद्योग सुरू

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य उद्योजकता विकास केंद्राने गेल्या पाच वर्षांत सुमारे १ लाख १३ हजार ६७२ विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण कौशल्य दिले आहे. परिणामी, कौशल्य प्रशिक्षणातून स्वयंरोजगाराचे बळ मिळाल्याने ६० हून अधिक जणांनी स्वत:चे लघुउद्योग सुरू केले आहेत.

कोरोना काळात मोठ्या संख्येने युवक-युवती बेरोजगार झाले होते. सद्य:स्थितीत जिल्ह्यात दिवसेंदिवस रोजगार मागणाऱ्या युवकांची संख्या वाढत आहे. शिवाजी विद्यापीठात २०१७रोजी कौशल्य उद्योजकता विकास केंद्र सुरू झाले. तरुणांना कौशल्याचे प्रशिक्षण देणे, उद्योगाचे प्रशिक्षण, गरज व उपलब्ध कौशल्य मोजणे त्याचबरोबर रोजगार



आणि स्वयंरोजगार विकसित करणे ही मुख्य उद्दिष्टे आहेत.

दरवर्षी केंद्रातर्फे विद्यापीठ संलग्न २८२ महाविद्यालये आणि विद्यापीठ कॅम्पसवरील ५० हजारांहून विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. यासाठी इन्फोसिस कंपनीने प्रशिक्षित केलेले १७९ तज्ज्ञ प्राध्यापक कार्यरत आहे. १ तास ते १ वर्ष मुदतीपर्यंतची सर्व प्रकारची कौशल्ये विद्यार्थ्यांना दिली जातात. यात जीवन कौशल्य व उद्योजकीय कौशल्याचा समावेश आहे. याचबरोबरच दिव्यांग, तृतीयपंथीय यांनाही कौशल्याचे प्रशिक्षण केंद्राच्या वतीने देण्यात आले आहे. प्रत्येक आठवड्यात कार्यक्रमाच्या माध्यमातून कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते.

### व्यवसायाचे प्रशिक्षण

कौशल्य उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने चॉकलेट मेकिंग, गूळ क्लस्टर ट्रेनिंगसह विविध महत्त्वाच्या व्यवसायांचे प्रशिक्षण दिले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल लिटरसी व पुणे येथील इन्फोसिस कंपनीस प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांना कौशल्याचे प्रशिक्षण दिले आहे.

पुढारी

# संस्कृती जपण्यासाठी नद्या जपा

## अस्लम सय्यद : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रत्येक नदीकाठी संस्कृती वसलेली आहे. मानवी हस्तक्षेपामुळे नद्यांचा ऱ्हास होत असल्याने पर्यायाने संस्कृतीचेही उच्चाटन होत आहे. संस्कृती जपण्यासाठी आपल्याला नद्या जपल्या पाहिजेत, असे प्रतिपादन मुंबई येथील पर्यावरण फोटोग्राफर आणि चेन्नई फोटो बिनालेचे विभागीय समन्वयक अस्लम सय्यद यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. ज़ाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे आयोजित 'पर्यावरण फोटोग्राफी' या विषयावर ते बोलत होते.

सय्यद म्हणाले, नदीकाठच्या संस्कृतीचे तातडीने डॉक्युमेंटेशन होणे आवश्यक आहे. मुंबई आणि परिसरातील नद्या गटारांमध्ये परावर्तितत झाल्या आहेत. नागरीकरणाच्या वाढत्या रेट्यामुळे मूळ संस्कृतीला धक्के बसले आहेत. मूळ संस्कृतीचे जतन करणे या काळात गरजेचे आहे. एखादी नदी नष्ट होते तेव्हा नदीकाठच्या लोकांची भाषा, संस्कृती, लोक व्यवहार हे सर्व नष्ट होते. नदीचे आणि नदीकाठच्या लोकसमूहाचे अतूट नाते आहे. आधुनिकीकरणाच्या दबावात हे नाते संपुष्टात येऊ लागले आहे. विकासाच्या नावाखाली नद्यांसह पर्यावरणाचा आणि जैवविविधतेचा मोठा ऱ्हास केला जात आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

फोटोग्राफी करत असताना माणसाच्या जगण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कोणतीही फोटोग्राफी माणसांकडे जायला हवी. समाजाच्या मुख्य प्रवाहाबाहेर असणाऱ्या आदिवासीसह इतर लोकसमूहांकडे फोटोग्राफीने विशेष लक्ष दिले पाहिजे, असेही ते म्हणाले. मुंबई लगतच्या नद्या आणि लोकसंस्कृतीवर त्यांनी केलेल्या केलेल्या फोटोग्राफीचे सादरीकरण केले. चेन्नई फोटो बिनालेच्या फोटोग्राफी स्पर्धेबाबतही त्यांनी माहिती दिली. स्वागत-प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. अभिजित गुर्जर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. मतीन शेख यांनी आभार मानले.

पुढारी

# खासगी विद्यापीठेही लवकरच शुल्क नियंत्रण समिती कक्षेत

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

खासगी विद्यापीठांनाही विद्यार्थी प्रवेशात एससी, एसटी, ओबीसी तसेच आर्थिक मागास आरक्षणांचे निकष पाळावे लागतील; अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच या विद्यापीठांनाही शुल्क नियंत्रण समितीच्या कार्यकक्षेत आणण्यासाठी लवकरच कायदा करणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी विधान परिषदेत स्पष्ट केले.

पुण्यातील जेएसपीएम शिक्षण संस्थेला खासगी विद्यापीठाचा दर्जा देणारे विधेयक सभागृहात संमत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राज्यात आतापर्यंत २२ खासगी स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना शासनाने मंजुरी दिली आहे. त्याच मालिकेत जेएसपीएम शिक्षण संस्थेला विद्यापीठाचा दर्जा देणारे विधेयक संमत करण्यात आले. विशेष, म्हणजे राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री तानाजी सावंत हे या संस्थेचे संस्थापक आहेत. या विधेयकावरील चर्चेदरम्यान आमदारांनी खासगी विद्यापीठांबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मंत्री पाटील म्हणाले की, राज्यात खासगी व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना मान्यता देण्यात येत असल्यामुळे उच्च शिक्षणाचे चांगले जाळे निर्माण होत आहे. या खासगी विद्यापीठांत केवळ श्रीमंत मुलांनाच प्रवेश मिळेल, हा भ्रम आहे. सर्वसामान्य, गरीब व शोषित मुलांना प्रवेश मिळावा, यासाठी सरकार शिष्यवृत्तीद्वारे त्यांचा खर्च उचलणार आहे. शासकीय विद्यापीठांत जे पात्रता निकष, नियम, कायदे, आरक्षण आहेत ते लागू करण्यात येतील. प्राध्यापक भरतीपासून व इतर सर्व बाबींवर सरकारचे नियंत्रण असणार आहे.

22 DEC 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# म. फुले यांचे स्त्री सक्षमीकरणासाठीचे योगदान अमूल्य

कोल्हापूर : महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री सक्षमीकरणासाठीचे योगदान अमूल्य आहे, असे प्रतिपादन न्यू कॉलेजच्या समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्चना जगतकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट व फार्मासुटिकल यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री सक्षमीकरणासाठीचे योगदान' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज या महामानवांच्या योगदानमुळे सद्यःस्थितीमध्ये मिळणारे हक्क, सोयीसुविधा हे फलित आहे. यावेळी प्रा. डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. पी. बी. दांडगे, नितीन नाईक, सीमा बुवा उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा अजमेरवर विजय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जबलपूर (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर संघाचा ५-० असा एकतर्फी पराभव केला. या सामन्यात विजय मिळवून शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सामन्यात विजयाची हॅट्ट्रिक केली.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच शिवाजी विद्यापीठ संघाने खेळावर ताबा ठेवला. १२ व्या मिनिटाला सिद्धेश साळोखेने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका संघाला १ गोलची आघाडी मिळवून गेला. त्यानंतर आक्रमणाची धार कायम ठेवत २१ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर केवल कांबळेने संघाचा दुसरा गोल केला. लगेचच ३८ व्या मिनिटाला सिद्धेश साळोखेने वैयक्तिक दुसरा गोल करून संघाला ३ ऱ्या गोलची आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत हीच आघाडी कायम राहिली. मध्यंतरानंतर ५८ व्या मिनिटाला रोहित पोवारच्या पासवर केवल कांबळेने वैयक्तिक दुसरा व संघाचा ४ था गोल केला, तर ६८ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर बदली खेळाडू निरंजन कामतेने ५ वा गोल करून शिवाजी विद्यापीठ संघास ५ गोलने विजय मिळवून दिला. संघाचा कर्णधार प्रतीक बदामे, रोहित देसाई, स्वयम साळोखे, प्रथमेश बाटे यांनी चांगला खेळ केला.

जनसंपर्क कक्ष
22 DEC 2022
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची विजयी घोडदौड

कोल्हापूर, ता. २१ : जबलपूर (मध्य प्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ, अजमेर संघाचा ५ गोलने पराभव करून विजयाची हॅट्ट्रिक केली. सामन्याच्या सुरवातीपासूनच विद्यापीठ संघाने खेळावर ताबा ठेवला. १२ व्या मिनिटाला सिध्देश साळोखेने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका संघाला १ गोलची आघाडी मिळवून गेला. त्यानंतर आक्रमणाची धार कायम ठेवत २१ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर केवल कांबळेने संघाचा दुसरा गोल केला. लगेचच ३८ व्या मिनिटाला सिध्देश साळोखेने वैयक्तिक दुसरा गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत हीच आघाडी कायम राहिली.



जबलपूर : शिवाजी विद्यापीठ व महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठाच्या सामन्यातील एक क्षण.

मध्यंतरानंतर ५८ व्या मिनीटाला रोहित पोवारचे पासवर केवल कांबळेने वैयक्तिक दुसरा व संघाचा ४ था गोल केला. ६८ व्या मिनिटाला प्रथमेश बाटे याच्या पासवर बदली खेळाडू निरंजन कामतेने ५ वा गोल करून शिवाजी विद्यापीठ संघास ५ गोलने विजय मिळवून दिला. संघाचा कर्णधार प्रतीक बदामे, रोहित देसाई, स्वयम साळोखे, प्रथमेश बाटे यांनी चांगला खेळ केला.

2 2 DEC 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिक्षक - पालक सुसंवाद विद्यार्थ्यांच्या आयुष्यात चमत्कार घडवेल'



कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमधील पालकसभेत बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर व मान्यवर.

**कोल्हापूर :** शिक्षक व पालक यांच्यातील सुसंवाद विद्यार्थ्यांच्या आयुष्यात चमत्कार घडवेल, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. ते शिक्षक पालक सहविचार सभेचे देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर येथे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मुलांचे शिक्षण हे पालकांचे प्राधान्य असावे तसेच त्यांना मोठी स्वप्ने बघण्यास प्रवृत्त केले पाहिजे, असे प्रतिपादन माजी परीक्षा नियंत्रक शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर माजी कुलसचिव संजय घोडावत विद्यापीठ डॉ. बी. एम. हिर्डेकर, यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही ए पाटील होते. अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांनी महाविद्यालया मार्फत चालवले जाणारे विविध उपक्रम याविषयी माहिती दिली. ज्युनियर विभाग प्रमुख श्री. बी. डी. डवंग यांनी आपल्या मनोगतामध्ये पालकांनी घ्यावयाची भूमिका याविषयी आपले मत व्यक्त केले. प्रा. सौ.टी.एस.चौगुले यांनी परीक्षा व मूल्यमापन पद्धती याविषयी पालकांना माहिती दिली.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. सौ.ए. व्ही.पाटील यांनी केले प्रा. आर.एम.कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ जी एन धुमाळ व प्रा. वंडकर यांनी केले.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा फुटबॉल स्पर्धेत अजमेरवर विजय

**कोल्हापूर :** जबलपूर (मध्यप्रदेश) येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी झालेल्या सामन्यांत शिवाजी विद्यापीठाने अजमेर येथील महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ संघाचा ५ गोलने पराभव करून विजयाची हॅटट्रिक केली. सामन्याच्या सुरवातीपासूनच शिवाजी विद्यापीठ संघाने खेळावर ताबा ठेवला. १२ व्या मिनीटाला सिध्देश साळोखेने मोठ्या डी बाहेरून मारलेला फटका संघाला १ गोलची आघाडी मिळवून गेला. त्यानंतर आक्रमणाची धार कायम ठेवत २१ व्या मिनीटाला प्रथमेश बाटेच्या पासवर केवल कांबळेने संघाचा दुसरा गोल केला. लगेचच ३८ व्या मिनीटाला सिध्देश साळोखेने वैयक्तिक दुसरा गोल करुन संघाला ३ गोलची आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापर्यंत हीच आघाडी कायम राहिली. मध्यंतरानंतर ५८ व्या मिनीटाला रोहित पोवारच्या पासवर केवल कांबळेने वैयक्तिक २ रा व संघाचा ४ था गोल केला. तर ६८ व्या मिनीटाला प्रथमेश बाटेच्या पासवर बदली खेळाडू निरंजन कामतेने ५ वा गोल करुन शिवाजी विद्यापीठ संघास ५ गोलने विजय मिळवून दिला.

संघाचा कर्णधार प्रतिक बदामे, रोहित देसाई, स्वयम साळोखे, प्रथमेश बाटे यांनी चांगला खेळ केला. उदया या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा सामना राजस्थानमधील उदयपूर येथील भूपाल नोबेल विद्यापीठ संघाबरोबर होणार आहे.